# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

**दिनांक १८.०८.२०२६ मंगळवार**

**१) मा. पोलीस आयुक्त नागपुर शहर यांचे हस्ते कारागृहातील बंदीवान यांना कौशल्य प्रमाणपत्र प्रदान व वस्तु विक्री केंद्राचे उद्‌घाटन संपन्न :—**

रक्षाबंधन सणानिमीत्त नागपुर मध्यवर्ती कारागृहातील महीला बंदी यांनी तयार केलेल्या राख्या तसेच बंदी यांनी तयार केलेल्या विविध वस्तुंचे प्रदर्शन आणि विक्री केंद्राचे उद्‌घाटन आज दिनांक १८.०८.२०२६ चे ०९.३० वा. कारागृह परिसर येथे मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे हस्ते संपन्न झाले. प्रदर्शनामध्ये बंद्‌यांनी तयार केलेल्या विविध हस्तनिर्मीत वस्तुंचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. ज्यामध्ये प्रामुख्याने राख्या, हातमाग साड्या, लाकडी व लोखंडी वस्तु, शो—पिस, दऱ्या, आसनपट्‌टी, कपडे, टॉवेल, चादर इत्यादी वस्तु विक्रीसाठी सर्व नागरीकांकरीता उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. वस्तु तयार करणाऱ्या बंदीवान यांना विविध प्रकारचे व्यवसायीक कौशल्य प्रशिक्षण देण्यात आले होते. कारागृहातील एकुण २७० बंदीवान यांनी प्रशिक्षणात सहभाग घेवुन, प्रशिक्षण यशस्वी केले होते. त्यामधील उत्कृष्ट प्रशिक्षणार्थी महीला व पुरूष बंदीवान यांना मा. पोलीस आयुक्तांचे हस्ते कौशल्य प्रमाणपत्रे याप्रसंगी प्रदान करण्यात आले.

मा. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्त यांनी बंदीवान यांनी बनविलेल्या वस्तुंची प्रशंसा करून, त्यांना त्यांचे आयुष्यात आशा प्रज्वलीत ठेवण्याचे व भविष्यकाळ सुकर करण्याचे आवाहन केले. भुतकाळ बदलता येत नाही, परंतु भविष्यकाळ कसा राहील व कारागृहातुन बाहेर पडल्यावर ते सुजाण नागरीक म्हणुन कार्य करतील. ज्यामुळे त्यांचे कुटुंबियांनासुध्दा त्यांचा अभिमान वाटेल. असे सांगुन मानसाच्या हातुन चुका घडत असतात, व त्याच चुका सुधारण्याची संधी प्रत्येकाला मिळत असते. त्यामुळे अशा संधीचे सोने करून जिवन जगण्याची शर्यत जिंकावी असा मोलाचा सल्ला दिला.

कार्यक्रमाअंती मा. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्त नागपुर शहर यांचे हस्ते कारागृह परिसरात वृक्षारोपन करण्यात आले. कार्यक्रमास श्री. वैभव आगे पोलीस अधिक्षक, मध्यवर्ती कारागृह, नागपुर, मा. श्रीमती दिपा आगे, अती. अधिक्षक, मध्य. कारा. नागपुर, तसेच ईतर कारागृह अधिकारी, प्रतिष्ठीत नागरीक, प्रशिक्षक इत्यादी मोठ्या संख्येने उपस्थित होते.








**२) पोलीस आयुक्तालय अंतर्गत, तणावमुक्ती प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न :—**

मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपुर शहर यांचे मार्गदर्शनाने व उपस्थितीत नागपूर शहर पोलीस दलातील सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार तसेच, मंत्रालयीन कर्मचारी यांचा दैनंदिन मानसिक ताणतनाव कमी व्हावा, या उद्देशाने आज दिनांक १८.०८.२०२६ चे १२.०० वा., तनावमुक्ती या विषयावर कार्यशाळा पोलीस भवन, ऑडीटोरीयम हॉल येथे आयोजीत करण्यात आली होती. नमुद कार्यशाळेत जे.सि.आय. फाऊंडेशन चे श्री. प्रशात कळम, श्री. अभिषेक तुमसरे, श्री. अनिल जैन, श्री. राहुल सोनुले, श्री. अमोल चौधरी व श्री. दिनेश खंडेलवाल यांनी उपस्थतीतांना मोलाचे मार्गदर्शन केले.

कार्यशाळेकरीता नागपुर पोलीस दलातील पोलीस अधिकारी व अंमलदार आणि मंत्रालयीन कर्मचारी जवळपास २०० हजर होते. नागपुर पोलीस दलातील संपुर्ण पोलीस अधिकारी व अंमलदार आणि मंत्रालयीन कर्मचारी यांना तणावमुक्त व निरोगी राहण्याचे दृष्टीने नमुद कार्यशाळेचे यापुढेही सलग आयोजन करण्यात येणार आहे.




**३) पोलीस आयुक्तालय अंतर्गत, गुन्हेगारांचा आदान—प्रदान कार्यक्रम संपन्न :—**

दिनांक १८.०८.२०२६ चे ११.०० वा., मा. पोलीस आयुक्त श्री. विश्वास नांगरे पाटील, यांचे संकल्पनेतुन व मार्गदर्शनाने नागपूर पोलीस आयुक्तालय अंतर्गत विविध पोलीस ठाणे तसेच, गुन्हेशाखा येथे अटक व मा. न्यायालयाकडून पोलीस कोठडी प्राप्त असणारे एकूण २६ अटक आरोपींचे आदान—प्रदान हे गुन्हेशाखा डिटेक्शन कार्यालय, काटोल रोड, गिट्टीखदान येथे पार पडले. आदान—प्रदान कार्यक्रमाचा मुळ उद्येश हा पोलीस अधिकारी व अंमलदार यांना आरोपींची ओळख पटावी, आरोपींची गुन्हे पध्दती समजण्यास मदत व्हावी तसेच, त्याचेवर कोणकोणते, किती व कुठे गुन्हे दाखल आहेत याबाबत माहितीचे आदान—प्रदान सुलभरितीने करता यावे असा होता. कार्यक्रम प्रसंगी मा. अपर पोलीस आयुक्त, श्री. राजेंद्र दाभाडे, मा. पोलीस उपआयुक्त (डिटेक्शन) श्री. दीपक अग्रवाल व मा. सहायक पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) श्री. वैभव जाधव हे उपस्थित होते. तसेच

आरोपींना अटक करणारे व हजर आणणारे संबंधीत पोलीस ठाणेंचे ठाणेदार, तपास पथक व एमओबी पथकातील अधिकारी व अंमलदार आरोपींसह हजर होते.

कार्यक्रम प्रसंगी मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) यांनी सीसीसी द्वारे चालणारी कार्यपध्दती त्याचप्रमाणे सिम्बा ॲप प्रणाली समजून घेवुन, हजर आरोपींची इत्यंभुत माहिती सिंबा प्रणालीमध्ये वेळीच अद्ययावत करण्याबाबत, त्याचप्रमाणे आरोपींचा डोजीअर फार्म, फिंगरप्रिंटस्, मोडस ऑपरेंडी याबाबत माहिती प्राप्त करुन संकलित करावी. अटक आरोपीतांवर योग्य त्या प्रतिबंधक कार्यवाही कराव्यात अशा हजर ठाणे प्रभारी व तपासी अधिकारी व अंमलदार यांना सुचना दिल्या.

**४) ''ईद–ए–मिलाद'' सणानिमीत्त आयोजीत बैठक संपन्न :–**

दिनांक २६.०८.२०२६ रोजी ''ईद–ए–मिलाद'' सण साजरा होणार असल्याने, मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे अध्यक्षतेखाली ईद–ए–मिलाद निमीत्त आयोजीत मुख्य मिरवणुकीचे आयोजक अध्यक्ष मरकजी सिरातुन्नबी कमेटी, मस्जिद मिरफैज, सि.ए. रोड, खदान, नागपूर यांचेसोबत आज **दिनांक १८.०८.२०२६ रोजी १३.०० वा.** कॉन्फरन्स हॉल, ०६ वा माळा, पोलीस भवन, नागपूर शहर येथे बैठक आयोजीत करण्यात आली होती. कार्यक्रमाची प्रस्तावना मा. श्री. रमेश धुमाळ पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा यांनी केली.

बैठकीमध्ये उपस्थितांसांबत मुख्य मिरवणुकीचे आयोजनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. मिरवणुकीमध्ये लहान मुले, तरूण, मोटारसायकल, रिक्षा, मॅटेडोर, जिप तसेच, अंदाजे १ लाख लोकांचा सहभाग असणार आहे. मा. पोलीस आयुक्त यांनी आयोजकांना मिरवणुकीमध्ये आक्षेपार्ह घोषणा वा नियमांचे उल्लंघन होणार नाही तसेच, सर्व बाबींचे रितसर परवाने घेण्याच्या सुचना देवुन, मिरवणुकीमध्ये स्वयंसेवक नेमण्यास सांगीतले. गर्दीचे नियंत्रणाकरीता आवश्यक उपाययोजना, पब्लीक ॲड्रेस सिस्टीम, बॅरीकेट्स, पि.ए. सिस्टीम चा वापर करण्याच्या सुचना दिल्या. मा. पोलीस आयुक्त यांनी सर्व अधिकारी यांना पोलीस ठाणे अंतर्गत निघणाऱ्या मिरवणुकींचे आयोजक यांचेसोबत संपर्क साधुन मिटींग घेण्याच्या सुचना दिल्या. मा. आयुक्तांनी आयोजक तसेच, कमीटी सदस्यांना पोलीस विभागातर्फे आवश्यक त्या उपाययोजना यांपुर्वीही केल्या असुन यावर्षीही केल्या जातील असे आश्वासीत करून, सामाजीक सलोख्याचे वातावरण राहील याकरिता कोणत्याही अफवांपासुन दुर राहण्याचे आवाहन केले.

बैठकीमध्ये मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह पोलीस आयुक्त, नागपुर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त, नागपुर शहर, मा. श्री. रमेश धुमाळ पोलस उपायुक्त, विशेष शाखा, नागपुर शहर, मा. श्री. आदीत्य मिरखेलकर, पोलीस उपायुक्त, वाहतूक शाखा, नागपुर शहर, श्री. सय्यद परेवज रिझवी अध्यक्ष मरकजी सिरातुन्नबी कमीटी, श्री. जावेद इकबाल खान, कमीटीचे इतर सदस्य, श्री. प्रमोद ठाकुर नगरसेवक मनपा.नागपुर, सर्व सहा. पोलीस आयुक्त, नागपुर शहर, सर्व वरीष्ठ पोलीस निरीक्षक, नागपुर शहर उपस्थीत होते.





**५) बॉम्बस्फोटाचे प्राप्त ई—मेलवरून नागपुर शहर पोलीसांची तत्पर शोध मोहीम व नागरीकांना आवाहन :—**

आज दिनांक १८.०८.२०२६ चे सकाळी १०.३० वा.चे सुमारास, नागपुर शहरातील वेगवेगळ्या एकुण १८ शाळांमध्ये तसेच, जिल्हाधिकारी कार्यालय येथे बॉम्बस्फोट घडवुन आणनेबाबत ई—मेल संबंधीत शाळांना व जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झाला होता. नागपुर शहर पोलीसांनी शाळांचे व्यवस्थापनांकडुन प्राप्त सुचनेचे धमकीवजा ई—मेलची त्वरीत दखल घेवुन, संपुर्ण पोलीस यंत्रणेला सतर्क केले. घटनेचे गांभीर्य व संख्या बघता बॉम्बशोधक व नाशक पथक, नागपुर शहर, तसेच नागपुर ग्रामीण व रेल्वे पोलीस बॉम्बशोधक व नाशक पथक योना व श्वान पथकांना पाचारण करून त्यांची एकुण ०६ पथके तयार केली. तसेच, पोलीस ठाणे अधिकारी व अंमलदार तसेच, जलद प्रतीसाद पथक, व नियंत्रण कक्ष येथील दंगा नियंत्रण पथके यांना संबंधीत ठिकाणी पाठवुन शाळांचे व्यवस्थापनाचे मदतीने शाळेतील विद्यार्थ्यांना शांत व संयमाने शाळेबाहेर काढुन त्यांचे पालकांना बोलावुन सुचना देवुन, त्यांना सुखरूपपणे घरी पाठविले. बॉम्बशोधक व नाशक पथक व श्वान पथकासह संपुर्ण शाळांचे ईमारती व परीसर आणि जिल्हाधिकारी कार्यालय परिसराची सखोल तपासणी केली. कोणत्याही ठिकाणी बॉम्ब सदृश्य वस्तु मिळुन आली नाही. प्राप्त धमकीवजा ई—मेलबाबत सायबर पोलीस ठाणे, नागपुर शहर येथे ई—मेल पाठविणाऱ्या दोन अज्ञात ईसमांविरूध्द कलम ३५१(२), ३५१(३), ६१(२) भा.न्या.सं., सहकलम ६६(ड) आय.टी. ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा पुढील तपास सायबर पोलीस करीत आहेत.

**नागपुर शहर पोलीस दलातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की,** त्यांनी आज बॉम्बस्फोट घडवुन आणनेबाबत प्राप्त ई—मेल घटनेबाबत कोणत्याही अफवा किंवा अप्रमाणित माहीतीवर विश्वास ठेवु नये वा अशा माहीतीचा प्रसार किंवा प्रचार समाज माध्यमांवर करू नये. नागारीकांनी नागपुर शहर प्रशासनाकडुन देण्यात येणाऱ्या अधिकृत माहीतीवर विश्वास ठेवावा. नागरीकांनी अशाप्रकारे कोणतीही आक्षेपार्ह वस्तु वा अनुचित प्रकार दिसुन आल्यास त्वरीत जवळील पोलीस ठाणे येथे संपर्क साधावा किंवा डायल ११२ यावर माहीती द्यावी.

**६) मा. न्यायालयातुन आरोपीला सश्रम कारावासाची शिक्षा :—**

दिनांक १८.०८.२०२६ रोजी मा. अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश—१५, तथा विशेष न्यायाधिश पोक्सो कोर्ट, नागपुर, श्रीमती एच. ए. अन्सारी मॅडमसाहेब यांनी त्यांचे कोर्टाचे विशेष केस क्र. ५१४/२०२४ मधील, पोलीस ठाणे हुडकेश्वर येथील अप. क्र. २२१/२०२४ कलम ३५४(अ)(१)(२),४५२ भा.दं.वि., सहकलम ८, १२ पोक्सो या गुन्ह्यातील आरोपी अशोक सदाशिवराव तळवेकर, वय ५६ वर्षे, रा. प्लॉट नं. ६४, माँ भगवती नगर, हुडकेश्वर, नागपूर याचेविरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, **आरोपीस कलम ४५१ भा.दं.वि. कायद्यान्वये ०१ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व ५००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास १५ दिवस अतिरीक्त कारावासाची शिक्षा तसेच, कलम ८ पोक्सो कायद्यान्वये ०३ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व २,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०१ महीना अतिरीक्त कारावासाची शिक्षा ठोठावली.**

दिनांक २१.०३.२०२४ चे १२.०० वा चे सुमारास, पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत राहणाऱ्या ५८ वर्षीय फिर्यादी यांची १६ वर्षिय अल्पवयीन नातेवाईक मुलगी घरी हजर असताना, आरोपीने त्याला तहान लागली म्हणुन, पाणी पिण्याचे बहाण्याने, अनधिकृतपणे घरात प्रवेश करून, पिडीतेसोबत असभ्य वर्तन करून तीचा विनयभंग केला. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे आरोपीविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला होता. आरोपीला दिनांक ०८.०६.२०२४ रोजी अटक करण्यात आली होती.

गुन्ह्याचे तपासी अधिकारी तत्कालीन पोउपनि. किरण महामुनी यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्रीमती योगीता राऊत यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्री. ऋषीकेश ढाले यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी मपोहवा. किर्ती फुकट यांनी काम पाहिले

**(कामगिरी)**

**पाचपावली पोलीसांची कामगिरी :— वाहन चोरास अटक, ०३ गुन्हे उघडकीस.**

दिनांक १६.०८.२०२६ चे ०१.०० वा. ते १०.१५ वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे पाचपावली हद्दीत टेका ग्राऊंड जवळ राहणारे फिर्यादी नामे तेहसिम रझा दानिश अहमद रझा, वय २५ वर्षे यांनी त्यांची काळ्या रंगाची एक्ट्रीम दुचाकी क्र. एमएच ४९ सिआर ९११८ किंमती ७०,०००/—रू. ची राहते घरासमोर लॉक करून, पार्क करून, ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची नमुद दुचाकी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पाचपावली येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

नमुद गुन्ह्याचे तपासात, पाचपावली पोलीसांनी तांत्रिक तपास करून, मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, सापळा रचून, आरोपी मोहम्मद फैजान अन्सारी शकील अन्सारी, वय १९ वर्षे, रा. चिराग अली चौक, टेका नवीन वस्ती, पाचपावली, नागपुर यास ताब्यात घेतले. आरोपीस गुन्हेसंबंधाने विचारणा केली असता, त्याने वर नमुद वाहनचोरी केल्याची कबुली दिली. आरोपीस अधिक विचारपुस केली असता, आरोपीने वर नमुद गुन्ह्याव्यतीरिक्त पोलीस ठाणे हद्दीतुन काळ्या रंगाची ॲक्टीवा गाडी क्र. एम.एच. ४९ बि.एच. ८६७२ किंमती ४५,०००/—रू. व स्प्लेंडर मोटारसायकल एम.एच. ३१ सि.ई. ६२३७ किंमती ३०,०००/—रू. असे एकुण ०३ वाहनचोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन एकुण ०३ वाहने १,४५,०००/— रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती विनीता शाहु, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. राहुल मदने, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ३), मा. श्री. शिवप्रसाद पारवे, सहा. पोलीस आयुक्त (लकडगंज विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. अनिरूध्द पुरी, सपोनि. सचिन भोंडे, पोहवा. विनोद समदुरे, फईम खान, प्रविण वावरकर, पोअं. गगन यादव, रूपेश सहारे व शहनवाज मिर्झा यांनी केली.



**(गुन्हे)**

**पोलीस ठाणे सक्करदरा :— हद्दपार ईसमास अटक.**

दिनांक १८.०८.२०२६ चे ०३.३० चे सुमारास, सक्करदरा पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, सेवादल नगर, शंकरसाई मठाजवळ एक हद्दपार इसम फिरत आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे मिळालेल्या वर्णनाचा इसम पोलीसांना पाहुन पळुन जात असता, त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव सुशिल उर्फ कोमा उत्तम वाघमारे, वय २० वर्षे, रा. भांडेप्लॉट, चाटे

कोचिंग क्लासमागे, सक्करदरा, नागपूर असे सांगीतले. त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०४ यांचे हद्दपार आदेश क्र. ३००१/२०२५ दिनांक २८.०७.२०२५ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, फिर्यादी पोहवा. टप्पुलाल चुटे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सक्करदरा येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे राणाप्रताप नगर :–** दिनांक १८.०८.२०२६ चे ०४.३० वा. चे पुर्वी, पोलीस ठाणे राणाप्रताप नगर हद्दीत, जयप्रकाश नगर चौकाजवळील इन्रीको हाईट्स व रेडीसन्स ब्ल्यु हॉटेलचे मागील बाजुस जुनी बंद पडलेली कोका कोला फॅक्टरी येथे जुने फर्निचर चे सामानाला आग लागल्याने फायर ब्रिगेडचे पथकाने आग विझविली. घटनास्थीळी पाहणी केली असता त्याठिकाणी एक अनोळखी प्रेत आगीत जळालेल्या अवस्थेत दिसुन आले. नमुद प्रेत हे पुरूष किंवा स्त्री जातीचे आहे याबाबत निश्चीत माहीती करीता, प्रेत उत्तरीय तपासणीकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे पाठविण्यात आलेले आहे.

याप्रकरणी पोलीस ठाणे राणाप्रताप नगर येथे अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**